26 मार्च

उदगिरी कारखान्याचे चेअरमन डॉ. राहुल शिवाजीराव कदम हे शांत, संयमी, जिज्ञासू वृत्तीचे अभ्यासू व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शिक्षण बी.ई. (कॉम्प्युटर), एमबीए (मार्केटिंग व एचआर) असून त्यांनी व्यवस्थापनामध्ये पीएच.डी. मिळवली आहे.

डॉ. राहुलदादा यांनी साखर कारखान्याबरोबरच आयटी, फार्मा, ऑटोमोबाईल, हॉर्टिकल्चर तसेच बांधकाम क्षेत्रामध्येही कौतुकास्पद ठसा उमटवला आहे. ते अल्पावधीत यशस्वी उद्योजक म्हणून परिचित झाले आहेत.

वेस्ट इंडियन शुगर्स असोसिएशनचे संचालक म्हणूनही त्यांनी यशस्वीपणे काम केलेले आहे. या संस्थेच्या माध्यमातून खासगी साखर कारखान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार पटकावणाऱ्या उदगिरी कारखान्याचे चेअरमन म्हणून ते अत्यंत प्रभावीपणे काम पाहात आहेत. मा. डॉ. शिवाजीराव कदम, मा. मोहनशेठदादा यांच्या मार्गदर्शनाखाली राहुलदादा यांनी खूप कमी कालावधीमध्ये कारखान्याचा नावलौकिक वाढविलेला आहे.

कारखान्याची उभारणी मौजे बामणीच्या ओसाड माळरानावर करण्यात आली. हा तालुका दुष्काळग्रस्त तालुका म्हणून ओळखला जातो. कारखाना उभारणी करताना पाण्याची उपलब्धता नव्हती, टँकरने पाणी आणून कारखान्याची उभारणी करण्यात आली. दैनंदिन २५०० मे. टन ऊसाचे गाळप, १४ मेगावॅट सहवीजनिर्मिती प्रकल्पाची विक्रमी, म्हणजे अवघ्या नऊ महिन्यामध्ये उभारणी पूर्ण करण्यात येऊन यशस्वी चाचणी गळीत हंगाम घेतला आहे. तसेच ३० हजार लिटर्स क्षमतेचा



# डॉ.राहुलदादा कदम
# यशस्वी युवा उद्योजक